<u>दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १९००/२०२२</u>

<u>निशाणी–१ खालील आदेश</u>

**सौ. लिलाबाई व इतर..वि... कोणीही नाही**

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ प्रमाणे "वारस दाखला" मिळणेकरिता दाखल केलेला आहे.

२. प्रस्तुत अर्जातील कथन की, अर्जदार क्र. १ ते ५ ह्या मयत **जानकीराम झंगोजी वानखडे** यांच्या विवाहीत मुली आहेत. मयत **जानकीराम झंगोजी वानखडे,** हे दिनांक ०६.०७.१९९० रोजी व अर्जदार यांची आई **मनकर्णाबाई जानकीराम वानखडे,** ह्या दिनांक १०.०८.२०२२ रोजी त्यांच्या घरी अकोला येथे मयत झाले आहेत. जानकीरामची आई ही ब–याच वर्षापूर्वी मयत झालेली आहे. जानकीराम व मनकर्णाबाई यांना प्रस्तुत अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत.

३. अर्जदार क्र. ४ सौ. अरुणा मधुकर लबडे हिने तिचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र निशाणी–६ वर दाखल केले आहे. अर्जदाराने कथनाच्या पुष्टार्थ निशाणी १२, १३ सोबत **मयत मनकर्णाबाई जानकीराम वानखडे,** हिच्या मृत्यूच्या दाखल्याच्या पडताळणी केलेल्या प्रत, नि. १४ ते १८ वर अर्जदार यांच्या आधारकार्डच्या प्रमाणीत प्रती अनुक्रमे दाखल केल्या आहेत

४. न्यायालयाच्या आदेशानुसार बेलिफामार्फत जाहिरनामा प्रसिध्द करण्यात आलेला आहे व दैनिक वृत्तपत्रामध्ये जाहीर नोटीसही प्रसिध्द करण्यात आलेली आहे. प्रस्तुत अर्जाकामी बेलिफामार्फत प्रसिध्द करण्यात आलेला जाहिरनामा हा निशाणी–१८ वर आहे व दैनिक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आलेली जाहीर नोटीस निशाणी–१० वर दाखल केलेली आहे. अभिलेखावर दाखल मृत्यू प्रमाणपत्राचे अवलोकन करता **मयत मनकर्णाबाई जानकीराम वानखडे,** ह्या दिनांक १०.०८.२०२२ रोजी मयत झालेल्या आहेत. अर्जदार यांनी जानकीराम यांच्या मृत्युप्रमाणपत्राची प्रत दाखल केलेली नाही. पण शपथावर पुरावा दिलेला आहे.

५. दिनांक २०.११.२०२२ रोजीच्या "दैनिक दर्शन'' या दैनिकामध्ये जाहीर नोटीस प्रसिध्द केल्यानंतर तसेच जाहिरनामा प्रसिध्द केल्यानंतर नेमून दिलेल्या कालावधीमध्ये कोणीही हरकत नोंदविली नाही. न्यायालयासमोर दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन करता तसेच अर्जदारांच्या प्रतिज्ञापत्रातील कथनांचा विचार करता हे न्यायालय या निष्कर्षास आले आहे की, अर्जदार हे **मयत जानकीराम व मनकर्णाबाई वानखडे,** यांचे कायदेशीर वारस आहेत. सबब, प्रस्तुतचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. त्या अनुषंगाने मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

<u>**आदेश**</u>

१. प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. असे घोषित करण्यात येते की, अर्जदार क्र. १ ते ५ हे **मयत जानकीराम झंगोजी वानखडे** व **मनकर्णाबाई जानकीराम वानखडे,** यांचे कायदेशीर वारस आहे.

३. अर्जदार यांच्या हक्कात योग्य तो कोर्ट फी स्टॅम्प जमा केल्यानंतर वारस दाखला देण्यात यावा.

(खुल्या न्यायालयात आदेश घोषीत करण्यात आला.)

(श्रीमती शु.भि.यादव)
दिनांक : २७.०२.२०२४.
**२ रे सह दिवाणी न्यायाधीश,**
**क. स्तर, अकोला.**